## संजय देशमुख : जुन्या आठवणींनी उपस्थितही भारावले

# उलगडला संशोधक-कुलगुरूपर्यंतचा पट

वैभव साळ्कर • दोडामार्ग

मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर प्रथमच दोडामार्ग तालुक्यात आलेल्या डॉ. संजय देशमुख यांनी एक संशोधक ते कुलगुरु असा आपला जीवनपट उलगडून दाखवला. यावेळी त्यांनी आपल्या आठवणींना उजाळा देत कोकणचे महत्त्व, कोकणचे उपकार आणि कोकणच्या शिक्षणातील गुणात्मक दर्जा यावर प्रकाशझोत टाकत उपस्थितांनाही भारावून सोडले.

मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा कार्यभार सांभाळल्यानंतर प्रथमच त्यांनी कोकणात येऊन दोडामार्ग तालुक्याला भेट दिली. यावेळी त्यांनी लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयात विद्यार्थी, शिक्षक, विविध मान्यवर व मित्रमंडळी यांच्याशी संवाद साधला. त्यांनी आपल्या आतापर्यंतच्या कारकिर्दीचा जीवनपट उलगडला. ते म्हणाले, मी मूळ मराठवाड्यातील. माझा कोकणाशी संबंध आला तो संशोधनाच्या निमित्ताने. १९५४ साली मी मुंबईत आल्यावर अनेक सामाजिक संस्थांमधून काम केले. संशोधनासाठी 'खारफुटी' वनस्पतीचा विषय निवडल्याने कोकणातील सागर किनाऱ्यांशी आणि पर्यायाने कोकणाशी माझे नातेसंबंध जुळले ते

- कुलगुरूपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर प्रथमच उलगडला जीवनप्रवास.
- कोकणच्या शिक्षणातील गुणात्मक दर्जा वाढविण्याचा मंत्र.
- खारफुटी संशोधनातून कोकणातील किनाऱ्याशी संपर्क आल्याचे हृदगत.



कायमचेच. या काळात रत्नागिरी असूदे अथवा सिंधुदुर्गातील शिरोडा येथे अनेक जिवाभावाचे मित्र आपणास मिळाले. भेटलेल्या सर्वच मित्रांनी आपल्याला खूप मदत केली. त्यामुळे ते सगळेचजण माझे गुरु आहेत. त्यांची मदत हे माझ्यावरील कोकणचे उपकारच आहेत. संशोधन करताना सायकलने ५० हजार किलोमीटरचा प्रवास केला. कधीकधी आर्थिक परिस्थितीमुळे पैसे अपुरे पडले. राहण्याची सोय होऊ शकली नाही. अशावेळी मित्रांनी चार-चार महिने पुरतील एवढे पैसे देऊन मला उपकृत केले. माझ्या शिक्षणाची काळजी ही प्रामुख्याने आईला होतीच; मात्र, वडिलांनी फक्त एकदाच केलेल्या उपदेशामुळे जीवनाचा अर्थ समजला. त्याला ठाम दिशा देण्यामध्ये अनेकांचा बहुमोल वाटा आहे, त्यापैकी कोकणचा वाटा अमूल्य असाच आहे.

मी जन्माने जरी मराठवाड्याचा असलो तरी कर्माने मात्र कोकणचाच आहे. कोकणशी माझी अतुट नाळ जुळलेली असून, कोकणनेच मला जगायला शिकवलं आहे. कोकणाला निसर्गाने भरभरुन दिलं आहे. ७२० किलोमीटर लांबीचा सागरकिनारा लाभला असून याठिकाणी मत्स्य व्यवसाय, बार्ज प्रशिक्षण, पर्यटन विषयक अभ्यासक्रम सुरु आहेत. मात्र, आतापर्यंत असे प्रशिक्षण देणारे कोर्सेस येथे उपलब्ध झालेले नाहीत. कोकणचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी आणि बेकारीच्या उच्चाटनाच्या दृष्टीने असे रोजगाराभिमुख कोर्सेस सुरु करण्यासाठी आपले प्रयत्न राहतील, असे त्यांनी सांगितले.

डॉ. देशमुख म्हणाले, भारतात शिक्षणाचा गुणात्मक दर्जा फारच कमी आहे. पदव्युत्तर शिक्षण घेण्याच्या गुणात्मक दर्जाचे प्रमाण केवळ सात टक्के आहे. हे वाढविण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. त्याकरिता १४ महिन्यांचा पोस्ट ग्रॅज्युएशनचा कालावधी ठरवता येऊ शकेल का? ही परदेशातील संकल्पना प्रायोगिक तत्त्वावर राबविण्याचाही आपला प्रामुख्याने प्रयत्न राहील. आज विनाअनुदानित तत्त्वावर चालणारी महाविद्यालये अनेक आहेत. या महाविद्यालयांबाबतचे प्रश्न सोडविण्यासाठीही विशेष मोहीम राबविण्यासाठी वरीष्ठ पातळीवर चर्चा सुरु आहे. देशातील शिक्षणाचा गुणात्मक दर्जा वाढवायचा असेल, तर प्रायोगिक तत्त्वावर देशातील सर्व विद्यापीठांमध्ये समन्वय साधून वेगळे प्रयोग करावेच लागतील.